MHNG16000702-2017
आर.सी.सी.१००/२०१७
सरकार वि. शैलेश
नि.क्र. १५

**सरकार तर्फे साक्षदार कमांक ०१ याची जबानी**
**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो कि,**
**नाव** :- गिता गंगाधर कारेमोरे,
**वय** :- ३५ वर्षे **व्यवसाय** :- मजुरी,
**राहणार :**- खात, ता. मौदा, जि. नागपूर
------------------------------------

**सरतपास शपथेवर सरकार तर्फे ॲड. श्री.एम.एम. पाटणकर यांचे व्दारा**

मी आरोपीला ओळखते. तो माझे घराजवळ राहतो. घटना ही अंदाजे ३ वर्षापूर्वी सकाळी ०७.०० वाजताचे सुमारास माझे घराजवळ असलेल्या नळाजवळ घडली होती. मी नळाचे पाणी भरण्यासाठी चवथा घगरा लावत होती. त्यावेळी आरोपी तेथे आला. माझा आणखी एक लहान घगरा भरायचे बाकी होते. त्यामुळे मी आरोपीस थोडे थांबण्यास सांगितले. त्यामुळे आरोपीने त्याचे कडील घगरा माझे डोक्यावर मारला होता. त्यामुळे माझे डोक्यातून रक्त निघाले होते. म्हणून मी पो.स्टे. येथे जावून फिर्याद दाखल केली होती. आता मला ती फिर्याद दाखवली त्यावर माझी सही असून त्यातील मजकुर बरोबर आहे. करीता फिर्यादला **नि.क.१६** देण्यात येते. आता मला प्रथम खबर दाखवली. त्यावर माझी सही आहे. करीता प्रथम खबरेस **नि.क.१७** देण्यात येते. पोलिसांनी माझे बयाण घेतले होते. पोलिसांनी मला खात येथील सरकारी दवाखाण्यात नेले होते.

**उलट तपास आरोपी तर्फे श्री. ए.एस. रेवतकर यांचे व्दारे.**

हे म्हणणे खरे आहे की मी प्रकरण आरोपीसोबत न्यायालयाबाहेर आपसात मिटवले आहे. घटनेच्यावेळी आमचे परिसरात एकच नळ होता. हे म्हणणे खरे आहे की आमचे आजूबाजूचे सर्वच लोक त्या नळावर पाणी भरण्यास येतात. पाणी भरतांना वादविवाद होत नसे. नळाला पाणी सकाळी ०७.०० वाजता येवून ०८.०० वाजता जात असे व दिवसातून एकदाच नळाला पाणी येत असे. हे म्हणणे खरे आहे की त्यामुळे लोकांना पाणी पुरेसे मिळत नसे. हे म्हणणे खरे आहे की तो नळ सरकारी नळ होता. हे म्हणणे खरे आहे की तो नळ माझे घराचे समोरच आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पाणी भरण्यास गेले असता माझा पाय घसरून पडल्याने माझे डोक्याला मार लागला होता. हे मला माहित नाही की आरोपीला आधी वेळेपणाचे झटके येत असे. हे मला माहित नाही की आरोपी हा मानसिक रोगतज्ञ डॉ. बांडेबुचे, डॉ. व्यवहारे व डॉ. आनंदकुमार यांचेकडे उपचार घेत असे. हे म्हणणे खरे नाही की, मी सर तपासात सांगितल्याप्रमाणेची घटना घडली नाही.

**उलट तपास पुर्ण.**
**फेर तपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

समक्ष

Digitally signed by Santosh Pundlikrao Wankhade
Location: Mouda
Date: 2020.02.12 11:37:22 +0530

दिनांकः १०/०२/२०२०

(एस.पी.वानखडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
मौदा.